# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

## ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222

---

जावक क्रमांक : यचममुवी/शिष्यवृत्ती/विसेवि/2019-20/ दिनांक : **15.06.2019**

## शैक्षणिक सत्र 2019-20 भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेचे Online अर्ज भरण्यासंदर्भात विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक सूचना

सुप्रिय विद्यार्थी मित्रांनो,

आपण शैक्षणिक सत्र 2019-20 मध्ये आपल्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतलेला आहे किंवा घेणार आहात त्यामुळे आपण या मुक्त विद्यापीठ परिवाराचे आता सदस्य झालेले आहात, किंवा होणार आहात, त्यामुळे आपणा सर्वांचे मुक्त विद्यापीठ परिवारात सहर्ष स्वागत

शिष्यवृत्तीचा पर्याय निवडून प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांनी कृपया शिष्यवृत्ती योजनेबद्दलची माहिती जाणून घेण्यासाठी विद्यापीठाच्या ycmou.ac.in या संकेतस्थळावरील Scholarship Tab मधील माहिती समजून घेणे आवश्यक आहे.

ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज योग्य रितीने सादर करता येण्यासाठी काही मार्गदर्शक दृक-श्राव्य चित्रफितींची (Video) निर्मिती करण्यात आली आहे. या चित्रफिती शिष्यवृत्ती कक्षाच्या Scholarship YCMOU या youtube Channel वर उपलब्ध आहेत. त्याही विद्यार्थ्यांनी बघणे आवश्यक आहे.

ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करणा-या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमाला शिष्यवृत्ती देय आहे किंवा नाही, याची कृपया खात्री करून घ्यावयाची आहे.

सद्यस्थितीत विद्यापीठाच्या B.A., B.A.(MCJ), B.C.A., B.Com., B.Lib., M.A.(English), M.Com., M.Lib., M.Sc. (Environment Science), & M.B.A. अशा दहा शिक्षणक्रमांच्या प्रवेशार्थी विद्यार्थ्यांनाच ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज संकेतस्थळाद्वारे भरता येत आहेत. याव्यतिरिक्त आणखी काही शिक्षणक्रमांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळावा, म्हणून संबंधित विभागांकडे पाठपुरावा सुरू आहे. त्यासंदर्भात आपणास नंतर कळविण्यात येईल.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या जात प्रवर्गासाठी प्रवेशित शिक्षणक्रमाला शिष्यवृत्ती देय आहे की नाही,याची कृपया खात्री करून घ्यावी.

विद्यार्थ्यांनी online scholarship अर्ज सदर करण्यापूर्वी विद्यापीठ संकेतस्थळावर व scholarship YCMOU या youtube Channel वरील दृक-श्राव्य चित्रफितीत (Video) दाखविल्याप्रमाणे सर्व मूळ दस्तावेज email account, google drive किवा pen drive असल्यास त्यावर सर्व प्रथम save/Download करून ठेवावेत.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज अभ्यासकेंद्रावर सादर करताना त्यासोबतच email account, google drive किवा pen drive मध्ये save केलेल्या सर्व मूळ दस्तावेजांच्या स्कॅन प्रती आपापल्या अभ्यासकेंद्रावर व शिष्यवृत्ती कक्षाच्या mail id वर पाठविणे आवश्यक आहे.

या स्कॅन प्रतींवरून आपला प्रवेश संमत (Approve) करण्यात येणार आहे. जे विद्यार्थी स्कॅन प्रती अभ्यासकेंद्रावर जमा करणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांचे अर्ज अभ्यासकेंद्राकडून संमत होणार नाही, याची कृपया सर्व विद्यार्थी मित्रांनी नोंद घ्यावयाची आहे.

विद्यार्थ्यांना mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करावे लागणार असून, सदर संकेतस्थळावर शैक्षणिक सत्र 2019-20 साठी अर्ज सादर करण्याची सुविधा अदयापपर्यंत उपलब्ध करण्यात आलेली नाही. मात्र विद्यार्थ्यांची वेळेवर धावपळ होऊ नये, यासाठी या सूचना देण्यात येत आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यापूर्वी पूर्वतयारी करता येईल.

सध्या जे शिक्षणक्रम संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्या शिक्षणक्रमांसाठी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरताना आपणास मार्गदर्शक अशा काही सूचना पुढीलप्रमाणे देत आहोत.

01. Mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी नविन अर्जदार नोंदणी, प्रोफाईल तयार करणे व शिष्यवृत्ती योजना निवडण्यासंदर्भात काही दृक-श्राव्य चित्रफिती (Audio Visual Films) तयार करण्यात आल्या असून शिष्यवृत्ती विभागाच्या Scholarship YCMOU या Youtube Channel वर येत्या दोन तीन दिवसात आपणास त्या बघण्याची सुविधा करण्यात येणार आहे.

02. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना कृपया ycmou.ac.in या संकेतस्थळावरील सर्व सूचना व Scholarship YCMOU या Youtube Channel वरील दृक-श्राव्य चित्रफिती बघणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यांचा अर्ज कमीत कमी वेळात व अचूकरित्या सादर करता येईल.

03. विद्यार्थ्यांनी online scholarship अर्ज सदर करण्यापूर्वी विद्यापीठ संकेतस्थळावर व scholarship YCMOU या youtube Channel वरील दृक-श्राव्य चित्रफितीत (Video) दाखविल्याप्रमाणे सर्व मूळ दस्तावेज email account, google drive किवा pen drive असल्यास त्यावर सर्व प्रथम save/Download करून ठेवावेत.

04. शासनाच्या निर्देशानुसार शिष्यवृत्तीचा ऑनलाईन अर्ज भरावयाचा असल्याने विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावरील भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीचाच अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावयाचा आहे. प्रवर्गनिहाय विभाग व शिष्यवृत्ती योजना पुढील तक्त्यानुसार आहे. कृपया आपल्या संबंधित प्रवर्गाच्या विभागासमोर दर्शविलेल्या शिष्यवृत्ती योजनेचेच अर्ज विद्यार्थ्यांनी सादर करावयाचे आहेत. या योजनेव्यतिरिक्त अर्ज सादर केल्यास ते अपात्र ठरविण्यात येतील.

| **अ.क्र** | **प्रवर्ग** | **विभाग** | **शिष्यवृत्ती योजना** |
|---|---|---|---|
| 01. | अनुसूचित जाती (SC) | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | Government of India Post Matric Scholarship |
| 02. | विमुक्त जाती व भटक्या जमाती (VJ/NT) | VJNT,OBC & SBC Welfare Department | Post Matric Scholarship to VJNT Students |
| 03. | इतर मागास वर्ग(OBC) | VJNT,OBC & SBC Welfare Department | Post Matric Scholarship to OBC Students |
| 04. | विशेष मागास प्रवर्ग (SBC) | VJNT,OBC & SBC Welfare Department | Post Matric Scholarship to SBC Students |
| 05. | अनुसूचित जमाती (ST) | Tribal Development Department | Post Matric Scholarship Scheme (Government of India) |
| 06. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थी | Directorate of Higher Education | Rajarshi Chatrapati Shahu Maharaj Shikshan Shulk Shishyavrutti Scheme |
| (उपरोक्त सर्व योजनांचे शासन निर्णय (GR) ycmou.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावरील scholarship Tab मधे उपलब्ध करून देण्यात आलेला आहेत, कृपया विद्यार्थ्यांनी त्याचे अवलोकन करावे, हि विनंती) | | | |

05. उपरोक्त तक्त्यातील अ.क्र. 5 व 6 मधील विद्यार्थ्यांनी ते पात्र असल्यास शिष्यवृत्ती अर्ज करण्यास हरकत नाही, मात्र ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यापूर्वी त्यांनी संपूर्ण शुल्क भरून प्रवेश घ्यावयाचा आहे. शासनाकडून शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर त्यांनी जमा केलेल्या शुल्काचा त्यांना परतावा करण्यात येईल.

06. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर करताना शासनाच्या http://mahadbtmahait.gov.in या scholarship portal वर अपलोड करावयाचे व विद्यापीठाच्या scholarship@ycmou.digitaluniversity.ac या मेल आयडीवर मेल करावयाच्या दस्तावेजांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. कृपया या यादीप्रमाणे आवश्यक असलेले सर्वच **<u>मूळ दस्तावेज (Original Documents)</u>** विद्यार्थ्याने अपलोड व मेल करणे अनिवार्य आहे. विद्यार्थ्यांनी आवश्यक दस्तावेज अपलोड व मेल केले नसल्यास सदर विद्यार्थ्याचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल व त्यासंदर्भात कुठलीही सूचना विद्यार्थ्यास दिली जाणार नाही.

07. प्रत्येक विद्यार्थ्याने Online शिष्यवृत्ती अर्जात **<u>स्वतःचा e mail id</u>**, नमूद करणे आवश्यक आहे कळविणे आवश्यक असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याचे ई मेल खाते आवश्यक आहे. सदर ई मेल वर विद्यापीठाकडून वेळोवेळी मेल पाठविण्यात येतात, कृपया विद्यार्थ्यांनी त्यांचे ई मेल अकाउंट तपासत रहाणे आवश्यक आहे. मागील सत्रात बहु तांश विद्यार्थ्यांनी email id न कळविल्याने त्यांचेशी संपर्क होऊ शकला नाही व पर्यायाने असे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरले.

08. प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर महाडिबीटी तसेच विद्यापीठाकडून वारंवार सूचना पाठविल्या जातात, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने सुरू असलेला **<u>स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक</u>** Online शिष्यवृत्ती अर्जात नमूद करणे आवश्यक आहे. मागील सत्रात बहु तांश विद्यार्थ्यांनी स्वत:चे क्रमांक न कळविता इतरांचे क्रमांक कळविल्याने त्यांचेशी संपर्क होऊ शकला नाही व पर्यायाने असे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरले.

09. http://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर या शैक्षणिक सत्रात (2019-20) पहिल्यांदाच Online शिष्यवृत्ती अर्ज सादर करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी Fresh या पर्यायाची निवड करावी, मात्र मागील शैक्षणिक सत्रात ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे, अशा विद्यार्थ्यांनी Renewal या पर्यायाची निवड करावी.

10. शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करताना महाविद्यालयाचा मान्यता प्रकार **Non Granted** असाच निवडावा.

11. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या व शिष्यवृत्ती अर्ज सादर करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे **राज्य - महाराष्ट्र**, **जिल्हा व तालुका - नाशिक** तसेच **महाविद्यालयाचे नाव - Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik** अशीच निवड करावयाची आहे.

12. शिष्यवृत्ती अर्ज पूर्णपणे भरल्यानंतर त्याचे प्रिंट काढून विद्यार्थ्याने ते अभ्यासकेंद्रावर सादर करणे बंधनकारक आहे. तसेच त्यासोबत **मूळ उत्पन्न दाखला, विद्यार्थी व पालकांची स्वाक्षरी / अंगठा असलेले विद्यार्थी व पालकांचे बंधपत्र ब, इतरत्र कोठेही प्रवेश घेतला नसल्याचे हमीपत्र, विद्यार्थी नोकरी करीत नसल्याचे हमीपत्र व शिष्यवृत्तीस अपात्र ठरल्यास हमीपत्र तसेच अभ्यासकेंद्राकडून प्राप्त करून घ्यावयाच्या दस्तावेजांच्या प्रती** अर्जासोबत जमा करणे आवश्यक आहेत. (उत्पन्न दाखल्याव्यातिरिक्तची प्रपत्रं / नमुने **ycmou.ac.in** या संकेतस्थळावरील **Scholarship Tab** मध्ये उपलब्ध आहेत)

13. विद्यार्थ्याला त्याच्या जात प्रवर्गानुसार व प्रवेशित शिक्षणक्रमानुसार प्राप्त होणारी शिष्यवृत्तीची रक्कम वेगवेगळी असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याने त्याबद्दलची माहिती जाणून घेण्यासाठी कृपया mahadbtmahait.gov.in या शिष्यवृत्ती संकेतस्थळावरील संबंधित विभागांनी प्रसिद्ध केलेली माहिती बघावी. तसेच विद्यार्थ्याने ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर केल्यास मंजूर होणारी शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने किंवा अर्जावर छापील स्वरुपात बघू शकतो.

14. कुठल्याही परिस्थितीत शिष्यवृत्ती अर्ज रद्द झाल्यास विद्यार्थ्याला विद्यापीठाकडे एकरकमी संपूर्ण शुल्क जमा करावे लागेल.

15. विद्यार्थ्याने ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज सादर केला म्हणजे शिष्यवृत्ती मंजूर झाली असा गैरसमज कृपया करून घेऊ नये. अभ्यासकेंद्र, विद्यापीठ मुख्यालय व शिष्यवृत्तीशी सबंधित उपरोक्त तक्त्यातील संबंधित विभाग यांचेमार्फत विद्यार्थ्याच्या अर्जाची व स्कॅन दस्तावेजांची तपासणी/पडताळणी झाल्यानंतर व त्यात त्रुटी आढळल्यानंतर विद्यार्थ्याचा शिष्यवृत्ती अर्ज रद्द होऊ शकतो.

16. शिष्यवृत्ती योजना ही भारत सरकारची (केंद्रा शासनाची) असून राज्य सरकारच्या विविध विभागांमार्फत ही योजना राबविण्यात येते. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची व स्कॅन दस्तावेजांची प्राथमिक पडताळणी विद्यापीठाकडून केली जाते. मात्र विद्यार्थ्याला पात्र ठरविण्याचा अंतिम निर्णय हा उपरोक्त तक्त्यातील संबंधित विभागांचा असतो, व जसजसे अनुदान प्राप्त होते, त्या पद्धतीने संबंधित विभागांकडून शिष्यवृत्तीचे वाटप होत असते. त्यामुळे विद्यापीठामार्फत ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज संबंधित विभागाकडे अग्रेषित केल्यानंतर विद्यार्थ्यांनी कृपया शिष्यवृत्ती कधी जमा होईल अशा प्रकारचे प्रश्न विचारू नयेत, ही विनंती.

17. विद्यार्थ्यांच्या लॉगीनला त्यांच्या अर्जाबाबत सर्वच माहिती घरबसल्या प्राप्त होत असल्यामुळे सातत्याने विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती संकेतस्थळावरील त्यांच्या अर्जाची सद्यस्थिती बघावी.

18. शिष्यवृत्तीची रक्कम शासनाकडून विद्यार्थ्याच्या आधार लिंक बँक खात्यावर जमा होणार असल्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करून घ्यावा.

19. शिष्यवृत्तीसंदर्भात वेळोवेळी माहिती प्राप्त करण्यासाठी प्रत्येक विभागीय केंद्राच्या जिल्ह्याचे Whats App समूह तयार करण्यात आले असून सदर समूहांची लिंक नंतर या संकेतस्थळावर देण्यात येणार आहे. कृपया सर्व विद्यार्थ्यांनी त्या लिंकवर क्लिक करून आपल्या विभागीय केंद्राच्या जिल्ह्याच्या समूहात सामील व्हावे, ही विनंती.

20. वारंवार शासनाकडून प्राप्त सूचना ycmou.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर, Whats App Group वर व scholarship ycmou या youtube Channel वर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत, त्यासाठीं विद्यार्थ्यांनी विद्यापीठ संकेतस्थळ, Whats App Group व scholarship ycmou या youtube Channel वरील सूचनांवर लक्ष ठेवावे.

PRAKASH SHANKARRAO ATKARE

Digitally signed by PRAKASH SHANKARRAO ATKARE
Date: 2019.06.16 16:29:29 +05'30'

(स्थळ प्रतीवर मा. संचालक, वि.से.वि. यांची स्वाक्षरी आहे.)